Vol III Issue VIII Feb 2014

ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## International Advisory Board

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest,Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.net**

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Volume-3 | Issue-8 | Feb-2014
Available online at www.aygrt.isrj.net

GRT

# डॉ आंबेडकरांचे कामगार चळवळीतील योगदान

संतोष गोविंद गांगुर्डे

सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग
पाटकर – वर्दे महाविद्यालय, गोरेगाव (प.)

**प्रस्तावना :**

सर्वसामान्यपणे डॉ.आंबेडकरांच्या कार्याचा विचार अस्पृश्योध्दार व भारतीय राज्य घटनेचे लेखन इतक्या मर्यादित स्वरुपातच केला जातो. पण या व्यतिरिक्त त्यांचा इतरही अनेक सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग होता. यातील प्रमुख कार्य म्हणजे कामगार चळवळीतील त्यांचे योगदान.

पुढील लेखनात डॉ.आंबेडकरांच्या कामगार चळवळीतील योगदानाची ओळख करुन देण्याचा प्रयत्न केला आहे.

***पारिभाषिक संज्ञा :***

कामगार चळवळ, मजुर पक्ष, सामाजिक न्याय, आर्थिक न्याय, वर्ग युध्द, इ.

### *आंबेडरपूर्व कामगार चळवळ :*

ब्रिटीश आमदनीच्या काळात महात्मा जोतिराव फुले यांच्या अथक प्रयत्नांनी पारंपारिक सामाजिक चौकट बदलण्यास सुरुवात झाली. त्यांनी केलेल्या वैचारिक मंथनामुळे समाज परिवर्तनास आरंभ झाला. श्रमिक, कष्टकरी व स्त्रियांच्या गुलामगिरीच्या मानसिकतेत बदल होण्यास प्रारंभ झाला. 1873 साली म.फुल्यांनी स्थापन केलेला सत्यशोधक समाज एक चळवळ बनली. दलित, कष्टकरी व स्त्रियांच्या उन्नतीचा मार्ग सर्वात आधी याच चळवळीने दाखविला. 1880 साली सत्यशोधक समाजाचे अनुयायी व म.फुल्याचे सहकारी नारायण मेघाजी लोखंडे यांनी 'बॉबे मिलहॅडस असोसिएशन' या संघनेची स्थापना केली. ही देशातील पहिली कामगार संघटना म्हणून नोंदली गेली. लोखंडेच्या या कामगार चळवळीमध्ये केवळ पगारवाढ हे ध्येय नव्हते. कामगारांचे कामाचे तास कमी व्हावेत, कामगारांची घरे त्यांच्या कामाच्या ठिकाणच्या जवळ असावीत, त्यांचे राहणीमान सुधारावे आणि ते खऱ्या अर्थाने शिक्षित व्हावेत यासाठी त्यांनी सतत प्रयत्न केले. या सर्व घटनांचा प्रभाव डॉ. आंबेडकरांच्या कामगार चळवळीतील कार्यावर दिसून येतो.

### *डॉ. आंबेडकर आणि भारतीय कामगार चळवळ :*

सार्वजनिक कार्याच्या आरंभापासूनच डॉ. आंबेडकर कामगार चळवळीशी निगडीत होते. सर्वांत अगोदर त्यांनी मुंबईतील कापड गिरण्यांमधून काम करत असलेल्या अस्पृश्य कामगारांच्या प्रश्नांबाबत आणि गिरणी कामगारांत काम करणाऱ्या कम्युनिस्ट नेत्यांबाबतीत आपली स्पष्ट मते 'बहिष्कृत भारत' या आपल्या पाक्षिकातून जाहीर केली. अस्पश्य कामगारांना कापड खात्यात काम मिळावे यासाठी त्यांनी आग्रही भूमिका घेतली होती. 1934 पासून त्यांनी म्युनिसिपल कामगार संघाचे अध्यक्षपद स्वीकारले. त्याकाळी म्युनिसिपल कामगारांत अस्तित्वात असलेल्या कम्युनिस्टांच्या संघटना व त्यांचे नेते दलित कामगारांच्या सामाजिक व इतर प्रश्नांकडे लक्ष देत नव्हते म्हणून स्वतंत्र संघटना स्थापन करावी असे स्पष्ट प्रतिपादनही त्यांनी केले. 7 नोव्हेंबर 1938 रोजी झालेल्या सार्वजनिक संपात तर स्वतः बाबासाहेबांनी फिरुन आपल्या कार्यकर्त्यांना सूचना दिल्या व संप यशस्वी केला.

### *स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना :*

1936 साली डॉ. आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्ष (इंडिपेंडंट लेबर पार्टी) हा नवा राजकीय पक्ष स्थापनेपूर्वी शेतमजूर व कामगारांचे शोषण जमीनदार मालकांकडून होत असल्याचे डॉ. आंबेडकरांना आढळून आले. या शोषणाविरुध्द आपले परखड मत आंबेडकरांनी व्यक्त केले. शेतमजूर व कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी एखादा लवाद असावा आणि त्या लवादाने दिलेले निर्णय बंधनकारक असावेत, ही भूमिका त्यांनी सातत्याने मांडली. त्याचबरोबर शेतकरी आणि कामगारांच्या प्रश्नांची जाण असणारा प्रतिनिधी कायदेमंडळात निवडून गेल्याशिवाय या वर्गासाठी आवश्यक असणाऱ्या कायदयांना मंजूर करुन घेणारे पाठबळ उभे राहणार नाही, ही भूमिका त्यांनी मांडली व त्या भूमिकेला मूर्तस्वरुप देण्याच्या उदेशाने त्यांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली.

नव्या पक्षाचे नाव 'स्वतत्र मजूर पक्ष' का ठेवले हे सांगताना बाबासाहेबांनी दिलेले स्पष्टीकरणही लक्षात घेण्यासारखे आहे. अन्य राजकीय पक्षांशी शक्य तेथे सहकार्य करण्याची नव्या पक्षाची तयारी असली तरी तो अन्य राजकीय पक्षाहून वेगळा व म्हणून स्वतंत्र असेल असे बाबासाहेबांनी बजावून सांगितले होते. सर्व अस्पृश्यांचा कष्टकरी मजूरांमध्ये समावेश होत असली तरी सर्व कष्टकरी मजूर काही अस्पृश्य समजले जात नव्हते. म्हणून केवळ अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या श्रमजीवी लोकांचेच नव्हे तर सर्वच मजुरांचे हित साधण्यासाठी व त्यांचे कल्याण करण्यासाठी स्वतंत्र मजूर पक्ष स्थापन केला असल्याचे बाबासाहेबांनी स्पष्ट केले होते (फडके,1998).

1935 साली ब्रिटीश संसदेने भारतासाठी एक कायदा संमत केला. या कायदयानुसार विधिमंडळात मोठया प्रमाणात प्रतिनिधीत्व मिळणार होते. या कायदयानुसार फेब्रुवारी 1937 मध्ये निवडणुका घेण्याचे जाहीर केले. ही निवडणुक लढवण्यासाठी आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना करुन मुंबई विधान मंडळाच्या

पहिल्या निवडणुकीत प्रचंड यश मिळवले. पंधरा राखीव जागांपैकी अकरा स्वतंत्र मजूर पक्षाचा मुख्य प्रतिस्पर्धी कॉंग्रेस पक्ष होता. स्वतंत्र मजूर पक्ष आणि कॉंग्रेस यामधील फरक स्पष्ट करताना नोव्हेंबर 1936 रोजी डॉ. आंबेडकर म्हणतात.

''कॉंग्रेस हे एक कडबोळे आहे तिच्यात बेकार मजूर, भांडवलदार, सावकार, शेतकरी, कुळे, जमीनदार, लहानमोठे व्यापारी, मध्यमवर्ग वगैरे असूनती परस्पर विरोधी हितसंबंधाच्या लोकांची एक मोट आहे. थोडक्यात सांगायचे म्हणजे ही एक आवळयांची मोट आहे. रक्त शोषण करणारा व रक्त शोशल्या जाणारा यांची मित्र म्हणून कशी सांगड घातली जाणार आज कॉंग्रेस धनिकांच्या मगरमिठीत बसली आहे. ती गोरगरीब, शेतकरी व कामकरी जनतेचे कोणते हित करणार कॉंग्रेस ही शेतकरी कामकाज वर्गाची संस्था नाही. ती भांडवलदारांची पाठीराखी आहे. तिच्या हातून बहूजन अशा श्रमजीवी लोकांचे हित होणे कठीण आहे. त्याच्या उलट आमचा स्वतंत्र मजूर पक्ष हा निर्भेळ वर्गतत्वाच्या पायावर उभारलेला आहे. आम्हाला जितके शेतकरी व कामकरी वर्गाचे हितरक्षण जिव्हाळयाचे करता येईल तितके कॉंग्रेसला करता येणे अगदीच अशक्य आहे. पददलित, गोरगरीब अशा श्रमजीवी वर्गाचे हितरक्षण व संवर्धन करणे हेच आमच्या पक्षाचे मुख्य कार्य आहे'' (गायकवाड, 2009).

***स्वतंत्र मजूर पक्षाची कामगिरी :***

स्वतंत्र मजूर पक्षाच्या स्थापनेनंतर व पहिली विधानमंडळाची निवडणुक लढविल्यानंतर डॉ. आंबेडकरांनी सातत्याने कामगारांच्या बाजूने आपली मते मांडली. मुंबई प्रांताच्या विधिमंडळाने संप आणि टाळेबंदी यांना प्रतिबंध करता यावा या उदेशाने विधिमंडळात एक विधेयक कॉंग्रेसच्या सल्ल्याने मांडले होते. या विधेयकावर टीका करताना 15 सप्टेंबर 1938 ला विधानसभेत डॉ. आंबेडकर म्हणाले, ''संप हा गुन्हा ठरवून कॉगेस सरकारने कामगारांवर गुलामगिरीच लादली आहे,'' या विधेयकाची खिल्ली उडविताना ते म्हणाले, ''हा कायदा कामगारांचे नागरी स्वातंत्र्य हिरावून घेणारा आहे,'' हे विधेयक हाणून पाडण्यासाठी कामगार संघटनाची 17 ऑक्टोबर 1938 ला एक दिवसाच्या संप जाहीर केला होता. या संपास डॉ. आंबेडकरांनीही पाठींबा दिला होता. या प्रश्नाने डॉ. आंबेडरांना शेतकऱ्यांचे व कामकऱ्यांचे प्रमुख प्रतिनिधी म्हणून देशपातळीवर मान्यता मिळवून दिली होती (सरवदे, 2012).

दि.12–13 फेब्रुवारी 1938 रोजी मनमाड येथे अखिल जी.आय.पी. रेल्वे अस्पृश्यकामगार परिषद आयोजित करण्यात आली. 13 फेब्रुवारी 1938 रोजी केलेल्या भाषणाने भारतातील कामगार चळवळीशी दशा आणि दिशा स्पश्ट केल्या. या भाषणातून आंबेडकरांनी भारतीय कामगार चळवळीचे मुदेसुद विवेचन केले आहे त्यांनी पुढील मुख्या बाबींचा उहापोह केला.

1. अस्पृश्यांनी आजवर दिलेल्या सामाजिक न्यायाच्या लढयाइतकाच त्यांच्या आर्थिक न्यायाचा प्रश्न महत्वाचा आहे.
2. ब्राम्हणशाही व भांडवलशाही हे देशातील कामगार वर्गाचे दोन शत्रू होत
3. भारतात सापेक्षपणे मालक–नोकर असे हे निश्चीत दोन वर्ग नाहीत
4. वंश (जाती) आणि धर्मामुळे कामगार हे एकमेकांचे शत्रू होतात
5. भारतीय कामगार पुढारी भांडवलशाही विरुध्द त्वेशाने बोलतात. पण ब्राम्हणशाही विरुध्द बोलत नाहीत
6. अस्पृश्यांची मजूर चळवळ ही भारतातील कामगार चळवळीविरुध्द किंवा मालकधार्जिणी नाही
7. स्वातंत्र्य, समता व बंधुभाव प्रस्थापित करणे हे कामगार वर्गाचे प्राथमिक स्वरुपाचे कर्तव्य आहे
8. श्राजकीय ध्येय विरहीत (राजकारण नको म्हणणारी) कामगार संघटना ही भांडवलशाही समर्थक राजकीय पक्षांचे कुरण होय
9. कामगारांनी कॉंग्रेसपासून स्वतंत्र स्वतःचा वेगळा राजकीय पक्ष स्थापन करावा
10. इंग्रज निघून गेले तरी देशातील जमीनदार, मिल मालक व सावकार कायम राहतील. या भांडवलदाराशी संघर्ष अपरिहार्य आहे
11. वर्गहिताच्या आणि वर्गजाणिवेच्या पायावर आधारलेल्या पक्षातच अस्पृश्यांनी सामील व्हावे
12. स्वतंत्र्य मजूर पक्ष बालवयात असला तरी हाच असा पक्ष आहे, की जो कामगार वर्गाला सर्वोच्च स्थान देतोत्र
13. सामान्य परिस्थितीत सनदशीर मार्गाचा अवलंब करण्यात येईल. परंतु वेळ आल्यास वर्गयुध्दाची तयारी असेल.
14. दलित वर्गाच्या आवश्यकतेवर भर देत असला तरी स्वतंत्र्य मजूर पक्ष जात आणि धर्म यांचा विचार न करता सर्व कामगार वर्गाच्या गरजांचा समावेश करण्याइतका विस्तृत आहे
15. अस्पृश्यांकरिता असलेल्या राखीव जागांचा उपयोग केवळ दलितांकरिताच नसून सर्व कामगार वर्गाच्या फायद्यासाठी आहे (गायकवाड, 2009)

वरील सर्व विवेचन सद्यस्थितीलाही तितकेच समर्पक आहे. यावरुन डॉ. आंबेडकरांच्या दूरदृष्टिची प्रचिती येते. आजही प्रस्थापित कामगार संघटना मागासवर्गीय कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांविषयी उदासीन आहेत.

***कामगारमंत्री डॉ. आंबेडकर :***

जुलै 1942 साली डॉ. आंबेडकर भारताच्या गव्हर्नर जनरलच्या केंद्रिय मंत्रिमंडळात कामगारमंत्री झाले. 1942–1946 या कालावधीत त्यांनी हे पद भूषविले. कामगारांचे प्रश्न व अडचणी त्यांनी जवळून पाहिलेल्या असल्यामुळे ते कामगारांचे प्रश्न समजून घेउ शकत होते. शासन, मालक व कामगार यांनी एकत्र बसून चर्चा करुन कामगारांचे प्रश्न सोडवण्याची संकल्पना त्यांनी पहिल्यांदाच मांडली.

टेड युनियनच्या संकुचित धोरणाबद्यल डॉ. आंबेडकराची काही ठाम मते होते. जो प्र्यंत कामगार चळवळ राजकीय सत्ता हस्तगत करण्याचे ध्येय बाळगत नाही, तोपर्यंत ही चळवळ कामगारांसाठी काहीही करु शकणार नाही आणि ही चळवळ म्हणजे कायमस्वरुपी पुढाऱ्यांच्या आपसांतील भांडणाचा अड्डा बनेल. संसदीय लोकशाहीचा फायदा घेउन क्षुल्लक कारणासाठी ट्रेड युनियनची स्थापना न करता सत्ताधारी बनण्याचे ध्येय टेड युनियनचे असले पाहिजे. त्यासाठी फार तर एखादा कामगार पक्ष काढावा व लोकांना दाखवून द्यावे की कामगारसुध्दा उत्तमरितीने राज्यकारभार सांभाळू शकतात. कामगारांना जर संसदीय लोकशाही व्यवस्थेत राहायचे असेल तर आपल्या उन्नतीचे एकमेव साधन म्हणजे टेड युनियन, हा भ्रम दूर करावा आणि या देशांची राजकीय सत्ता आपल्या हातात घ्यायचा प्रयत्न करावा जेणेकरुन त्यांच्या सर्व प्रश्नांना वाचा फुटू शकेल.

महिला कामगारांच्या हक्कांबाबत देखील डॉ. आंबेडकर कमालीचे जागरुक होते. त्याचे उदाहरण म्हणजे महिला कामगारांना बाळंतपणाच्या पूर्वी दहा आठवडे आणि नंतर चार आठवडे रजा देण्याचे, तसेच इतर फायदेही त्यांनी जाहीर केले. एवढेच नाही तर स्त्रियांनासुध्दा पुरुशांएवढेच वेतन दिले जाईल असा नियमही त्यांनी करुन घेतला.

***स्वतंत्र मजूर पक्ष आणि भोतकऱ्यांचे प्र न :***

ग्रामीण भागातील अस्पृश्यांसकट सर्व शेतमजूरांची आणि कर्जबाजारी कुळांची स्थिती सुधारण्यासाठी तत्कालीन कायद्यात दुरस्त्या सुचविणारी विधेयके डॉ. आंबेडकरांनी मुंबईच्या विधानसभेत मांडली. त्यांच्या पक्षाचे कायदेमंडळाच्या दोन्ही सभागृहातील बळ फारच कमी असल्याने त्यांनी मांडलेली विधेयके मंजूर होण्याची सुतराम शक्यता नव्हती. तरीही आंबेडकरांनी मुंबई इलाख्यातील शेतमजूरांच्या, वेठविगारांच्या आणि कर्जबाजारी कुळांच्या गाऱ्हाण्यांना वाचा फोडली. खेर मंत्रिमंडळाचे धोरण कसे कारखानदारधर्जिणे आहे आणि कॉंग्रेस, सावकारांनी आणि जमीनदारांनी चालविलेल्या शोषणास कशी आळा घालू इच्छित नाही ते उघडकीस आणण्याचाही बाबासाहेबांनी सतत प्रयत्न केला.

17 सप्टेंबर 1937 रोजी बाबासाहेबांनी मुंबई विधानसभेत दोन विधेयके मांडली. त्यापैकी पहिले होते वंशपरंपरागत हुद्यासंबंधीच्या कायद्यात दुरुस्त्या सुचविणारे,

तर दुसरे होते खोती पध्दती नष्ट करण्यासंबंधीचे, याबरोबरच बाबासाहेबांनी महार वतन नष्ट करण्यासंबंधीचे विधेयक देखील मांडले.

1 जुलै 1938 रोजी डॉ.आंबेडकरानी एक महत्त्वाचे पत्रक प्रसिध्द केले, त्यात ते म्हणतात ''कोटयावधी लोकांना रक्ताचे पाणी करुन देखील पोटाची खळगी भरता येत नाही की अंगभर वस्त्र मिळत नाही. जमीनदारी, मालगुजारी, खोती, तालुकदारी, सावकारी, इनामदारी, भांडवलशाही वगैरे सारख्या ज्या जुलमी पध्दती देशात रुढ आहेत त्या पध्दतीमुळे केलेल्या कामाचा पूर्ण मोबदला शेतकरी, किसान किंवा मजूर यांच्या पदरात पडत नाही. म्हणून देशातील या शेकडा 80 टक्के लोकांवरील होणारा जुलूम समूळ नष्ट करुन त्यांचे जीवन सुखाचे करणे हेच खरे राजकारण होय आणि ज्या राजवटीत शेतकरी–मजुरांना पिळणारे शेठ–सावकार यांचेच प्राबल्य असते ती राजवट देशाचे खरे हित कधीच साधू शकणार नाही'' (गायकवाड,2009).

***समारोप :***

डॉ. आंबेडकरांचे कामगार चळवळीबाबतचे विश्लेषण हे आजच्या परिस्थितीला देखील तंतोतंत लागू आहे. या वरुन त्यांचे द्रष्टेपण लक्षात येते. आंबेडकरांनी कामगार चळवळीतील आपल्या संपूर्ण मांडणीत शेतकरी, भूमीहीन, मजूर, महिला कामगार या सर्व घटकांचा साकल्याने विचार केला. या देशातील ब्राम्हणवाद व भांडवलशाही यांचे समूळ उच्चाटन केल्याशिवाय ही चळवळ सशक्त होणार नाही हे त्यांनी वेळोवेळी मांडले. कामगार संघटनांनी मुख्य राजकीय प्रवाहात येउन आपल्या समस्या सोडवण्याचा प्रयत्न केला तरच कामगार चळवळ अधिक प्रभावी होऊ शकेल हे त्यांनी स्पष्टपणे सांगितले. आज आपण पाहतो की, कामगार चळवळीत व राजकीय चळवळीत मोठे अंतर पडले आहे. राजकीय चळवळीत कामगारांच्या प्रश्नांना फारसे महत्व दिले जात नाही. त्यामुळे कामगार चळवळीचा जोम कमी झालेला दिसतो. समस्त कामगार संघटनांनी डॉ. आंबेडकरांचा विचार अमलात आणला असता तर कदाचित आज भारतीय कामगार चळवळीचे वेगळेच चित्र दिसले असते.

***संदर्भ :***

1. उत्तम कांबळे संपादित श्रमिकांचे जग : काल, आज आणि उद्या मधील भीमराव सरवदे यांचा डॉ. आंबेडकराचे कामगार धोरण हा लेख पृ.142–165, लोकवाङ्मयगृह, मुंबई,.2012.
2. प्रदीप गायकवाड संपादित कामगार चळवळ : डॉ. आंबेडकरांची निवडक भाषणे पृ. 5–7, क्षितीज पब्लिकेशन नागपूर.
3. चांगदेव खैरमोडे लिखित डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, खंड 7 सुगावा प्रकाशन, पुणे, 1998.
4. य.दि.फडके लिखित आंबेडकरी चळवळ, पृ..85, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, 1998

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.net